00383

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

## जून, 2012

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*समय : 2 घण्टे* *अधिकतम अंक : 50*

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : 10

   (a) भ्रष्टाचाराचे भूत

   (b) मला आवडलेले पुस्तक

   (c) निसर्ग आणि मानव

   (d) शिक्षणाचे महत्त्व

2. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : 8

   (a) तुकारामांनी एकान्तवासातील सुखाचे वर्णन कसे केले आहे ?

   (b) कवि अलौकिक सृष्टीचा निर्माता असतो असे केशवसुतांनी का म्हटले आहे ?

   (c) कोळसेवाल्याच्या रेखाचित्रातून यंत्रयुगातील मानवाचे चित्रण मर्ढेकरांनी कसे केले आहे ?

   (d) 'कातरवेळ' या कथेत अक्कावर मायेचा, कौतुकाचा वर्षाव कसा झाला ?

3. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(a) प्रल्हाद बहिणीच्या घरी न जाता मरीआईच्या देवळात का थांबत-बसत असे ?

(b) आकाशगंगेच्या एका कोपऱ्याचे रंगीत छायाचित्र पाहून शिरवाडकरांच्या मनात कोणते विचार आले ?

(c) कुंजाला सांबर मारता येत नाही की त्याला सांबर मारणे मान्य नाही ?

(d) गुंड्याभाऊ आणि चिमणराव मुंबईला गेल्यावर डॉक्टरांच्या चक्रात कसे अडकतात ?

4. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** विषयांवर टीपा लिहा : 6

(a) कादंबरी नाटकांतील व्यक्ती 'कल्पित' खऱ्या पण खोट्या नव्हेत.

(b) बालगंधर्वांचे रंगभूमीवरील दर्शन.

(c) जाहिरात देण्यापासून मिळणारे लाभ.

(d) उत्तम पत्रव्यवहाराची वैशिष्ट्ये.

5. (a) क्रियाविशेषण म्हणजे काय ते सोदाहरण सांगा. 2

(b) पुढील शब्दांचे अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा. 3

(i) हेवा (ii) नि:संग (iii) सुधा

6. खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्यप्रचारांचा अर्थ सांगा : 3

(a) मन भरून येणे

(b) तिलांजली देणे

(c) निगा राखणे

(d) पावले जड होणे

(e) लवून चोपून राहणे

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) चोराच्या मनात चांदणं.

(b) चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे.

(c) हातच्या काकणाला आरसा कशाला ?

(d) खाईन तर तुपाशी, नाहीतर उपाशी.

(e) शेळी जाते जिवानिशी, खाणारा म्हणतो वातड.

7. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर लिहा : **4**

(a) भाऊराव पाटिलांनी वसतिगृहाचे शिक्षणक्षेत्रातील महत्त्व कसे पटवून दिले ?

(b) स्त्रीविषयक पारंपारिक व आधुनिक दृष्टिकोण कोणते ?

(c) विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कोणते इष्ट व अनिष्ट परिणाम झाले ?

(d) भूमीच्या नाशाला मानव जबाबदार कसा ?

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : **4**

Galileo was always experimenting. Even as a child he refused to rely upon the authority of others. He submitted everything to the scrutiny of his own senses and his own mind. The son of a music master, he showed almost from infancy an interest in "the music of the spheres." His father referred to him as an absent - minded little star - gazer who saw strange visions and heard uncanny sounds. At school, when the teacher was trying to explain the importance of the Latin preposition or of the Italian verb, young Galileo's mind was floating amongst the clouds in the wake of the toy balloon which his father had bought him as a birthday present.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : **4**

राजवाडे यांची भाषा संस्कृतशब्द प्रचुर आहे, तरी पण ती जातिवंत व शुद्ध मराठी वळणाची वाटते. त्यांचे लिहिणे फार परिणामकारक असे. त्यांच्या प्रस्तावना वाचावयास वाचकांच्या उड्या पडत. त्यांच्या भाषेचे दुसऱ्यांस अनुकरण करण्यास येत नसे. त्यांच्या प्रत्येक शब्दावर त्यांचा ठसा असे. राजवाडे यांची भाषा ताबडतोब ओळखू येते. एखादे वाक्य, एखादा उतारा वाचला म्हणजे हा राजवाडी असला पाहिजे असे ताबडतोब सांगता येते. इंग्रजीमध्ये कार्लाइलची भाषाशैली जशी अगदी निराळी व स्पष्टपणे उमटून पडणारी दिसते, तसेच राजवाडी भाषेचे आहे.

---